कृपया, प्रसिध्दी करिता सादर
संपादक/वृत्तसंपादक

(हनुमंत गोफणे)
जनता संपर्क अधिकारी
बेस्ट उपक्रम
दूरध्वनी क्र.२२७९९३९५

PRESS NOTE
THE BRIHAN MUMBAI ELECTRIC SUPPLY & TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192, Mumbai - 400 001.

बेस्ट
प्रसिध्दी पत्रक
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र.१९२, मुंबई - ४०० ००१.

प्रसिध्दी पत्रक क्र.६
दिनांकः १३.०६.२०१८

## विना तिकीट प्रवास टाळा : प्रवाशांना आवाहन.

मुंबई, १३ : बेस्ट बसगाडयांमधून विना तिकीट प्रवास करणा-या प्रवाशांविरुध्द तसेच खरेदी केलेल्या तिकीटाने प्रमाणित केलेल्या अंतरापेक्षा जास्त प्रवास करणा-या प्रवाशांविरुध्द उघडण्यात आलेल्या विशेष मोहिमे अंतर्गत जानेवारी,2018 ते एप्रिल,2018 या चार महिन्यात एकूण 10,971 प्रवासी आढळले असून त्यांच्याकडून रु.9,96,611/- एवढी रक्कम दंडापोटी वसूल करण्यात आली आहे.

विना तिकीट प्रवास करणा-या प्रवाशांनी प्रवास भाडे अधिक देय प्रवासी भाडे रकमेच्या दहापट भरणा करण्याचे नाकारल्यास, मुंबई महानगरपालिका अधिनियम 1888 च्या कलम 460 (ह) अन्वये एक महिना पोलीस कोठडी किंवा रु.200/- पर्यंत दंड किंवा दोन्ही शिक्षा एकत्रितपणे देण्याची तरतूद आहे.

वस्तुतः बसमधून प्रवास करताना योग्य तिकीट खरेदी करणे हे प्रत्येकाला बंधनकारक असून विना तिकीट प्रवास करणे हा सामाजिक गुन्हा देखील आहे. तेव्हा सर्व बसप्रवाशांनी आपले आर्थिक नुकसान आणि मानहानी टाळण्यासाठी योग्य तिकीट अथवा वैध बसपास घेऊन, तिकीट व बसपासवर प्रमाणित केल्याप्रमाणे प्रवास करावा, असे आवाहन बेस्ट उपक्रमातर्फे करण्यात आले आहे.

*******************